# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक १९.०४.२०२६ रविवार

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे ईमामवाडा :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १९.०४.२०२६ चे १२.५५ वा. चे सुमारास, ईमामवाडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, गिरी कॉलोनी रोड, चार खंबा मैदान जवळ, रेल्वे क्वॉर्टरचे वॉल कंपाऊंड जवळ, सार्वजनिक ठीकाणी दोन ईसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे दोन ईसम दिसल्याने त्यांना थांबवून पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) कमलेश उर्फ कम्मु राजेश राऊत, वय १९ वर्षे, रा. इंदिरा नगर, जाटतरोडी नं. ०३, ईमामवाडा, नागपूर, २) रमण सिध्दार्थ भगत, वय १९ वर्षे, रा. दलित वाचनालय जवळ, रामबाग, ईमामवाडा, नागपूर असे सांगीतले. आरोपी क्र १ चे ताब्यातुन एक लोखंडी तलवार किंमती २००/— रू. ची मिळून आल्याने जप्त करण्यात आली. आरोपी हे कोणता तरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्यानी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे ईमामवाडा येथे आरोपींविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. सहकलम ३(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. १६, साईबाबा नगर, संतोषी माता मंदीर जवळ, वाठोडा, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. रूपाली प्रशांत चौधरी, वय ३१ वर्षे यांचे पतीची प्रकृती अस्वथ असल्याने ते मागील १० दिवसापासून धंतोली येथे हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहे. फिर्यादी ह्यासुध्दा दवाखान्यात सोबत राहतात. दिनांक १६.०४.२०२६ चे १३.३० वा. ते दिनांक १४.०४.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आपले राहते घराला कुलुप लावुन दवाखान्यात गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,४५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. सागर लगड ७०८३०३८९२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— प्राणांतीक अपघाताचा गुन्हा दाखल.**

दिनांक १५.१०.२०२५ चे १४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, बालाजी नगर, हिंगणा नाका येथून फिर्यादीचा भाऊ नामे राजेश ईमरतसिंग धुर्वे, वय २३ वर्षे, रा. ग्राम ददीया, ता. बिछीया, जि. मंडला (म.प्र.) ह.मु. वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपुर हे पायदळ रोड क्रॉस करीत असतांना,

त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने, ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारा करीता मेडीकल हॉस्पीटल ट्रामा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारा दरम्यान दिनांक १७.१०.२०२५ चे ०३.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, फिर्यादी दिपक कुमार ईमरतसिंग धुर्वे, वय २२ वर्षे, रा. ग्राम ददीया, ता. बिछीया, जि. मंडला (म.प्र.) यांनी दिलेल्या तक्रारीवरून, अज्ञात वाहन चालक याने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाला धडक देवुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला.

याप्रकरणी पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि. अक्षय गवादे ८३७९८४१८४७ यांनी अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**